# इफिसकरांस पत्र

Ephesians

# इफिसकरांस पत्र

## 1

1 येशू ख्रिस्तांच्या त्या पवित्र आणि विश्वसनीय लोकांच्या नांवें जे इफिसांत आहेत, ज्या सर्वांसाठी परमेश्वर पित्याच्या
इच्छेने पौल ख्रिस्त येशूंचा प्रेषित आहे. 2 आपले स्वामी येशू ख्रिस्त आणि स्वर्गीक पित्यापासून तुम्हांला अनुग्रह
(अटविना कृपा) आणि शांति मिळावी.
3 आपल्या येशू ख्रिस्तांचा पिता आणि परमेश्वर याची स्तुति असो, ज्याने आपल्याला स्वर्गीक स्थानी सर्व आध्यात्मिक
आशीर्वादांनी भरून टाकले आहे. 4 अगदी त्याप्रमाणे, जसे त्याने जगाचा पाया घालण्यापूर्वीच आपल्याला ख्रिस्तांठायी
निवडून घेतले होते जेणेकरून आपण त्याच्यासमक्ष पवित्र आणि निर्दोष ठरविले जावे. 5 आपल्या इच्छेच्या
समाधानाच्या उत्तम हेतूनुसार पूर्वनिर्धारित केल्याप्रमाणे, त्याने येशू ख्रिस्तांद्वारे प्रेमाने आपल्याला दत्तक घेतलेल्या
मुलांसारखे ठरविले (नियुक्त) आहे. 6 त्याच्या असीम कृपेमुळे आणि गौरवाच्या स्तुतिकरिता तसे झाले, ज्याद्वारे त्याने
आपल्याला आपल्या (त्याच्या) प्रियकराठायी स्वीकार केलेले आहे. 7 त्याच प्रियाठायी आपल्याला त्यांच्या रक्ताने
मुक्ति अर्थात अपराधांची क्षमा, अनुग्रहाच्या (कृपेचा खजिना) धनामुळे आहे. 8 समजेसमवेत त्याने सर्व ज्ञान,
आपल्यावर विपुल प्रमाणांत ओतलेले आहे. 9 पूर्वीपासूनच केलेल्या योजनेन्वये ज्या उत्तम लक्ष्याची (संकल्पनेची)
कामना, परमेश्वर पित्याने केली होती त्यानुसारच त्याने आपल्यावर आपले रहस्य प्रगट केले. 10 असे यासाठी आहे की
त्याने, स्वर्ग आणि पृथ्वीवरच्या सर्व बाबी, समय पूर्ण होईपर्यंत ख्रिस्तांमध्ये एकत्र कराव्यात,
11 त्याबरोबरच आपण येशू ख्रिस्तांठायी परमेश्वर पित्याकडून वतन मिळविलेले आहे, कारण त्याने आपल्याला
पूर्वीपासूनच निवडून घेतले आणि ते सर्व त्याच्या इच्छेद्वारेच आहे. 12 यासाठी की आपण ज्यांनी पूर्वीच ख्रिस्तांवर
विश्वास ठेवला होता, गौरवाने परिपूर्ण परमेश्वराची स्तुति करावी. 13 ज्या वेळी तुम्ही सत्याचे वचन (मुक्ति संदेश) ऐकले
त्या वेळी विश्वास ठेवला आणि त्या विश्वासायोगे प्रतिज्ञेचा (अभिवचन) शिक्का मिळविला. 14 तो (पवित्र आत्मा)
आपल्या उत्तराधिकाराच्या विसाराप्रमाणे यासाठी दिला गेलेला आहे, की परमेश्वराने विकत घेतलेले लोक सोडविले
(मुक्ती, उद्धार) जावेत आणि परमेश्वराच्या गौरवाची स्तुति व्हावी.
15 यास्तव ख्रिस्तांवरचा तुमचा विश्वास आणि पवित्र लोकांसाठीचे जे तुमचे प्रेम आहे, 16 ते ऐकून मी देखील
तुमच्यासाठी आभारांसह प्रार्थना करणे थांबवीत नाही. 17 माझी विनंती अशी आहे की आपल्या प्रभू येशूंचा परमेश्वर व
गौरवमय पिता, याने तुम्हांला आध्यात्मिक ज्ञान, प्रकाश आणि परमेश्वरी ज्ञानाठायी बुद्धि आणि प्रकाश द्यावा. 18 मी
यासाठी प्रार्थना करितो, की तुमच्या अंतःकरणाचे (समज) डोळे उघडावेत म्हणजे तुम्हांला कळावे की बोलाविले
जाण्याविषयीची तुमची आशा आणि पवित्र लोकांकरिताचे त्याचे गौरवमय वतनाचे धन काय आहे. 19 आणि आपण जे
विश्वास करणारे त्यांच्याकरिता त्याच्या अपार शक्तीची महानता काय आहे, हे त्याच्या शक्तिमान प्रभावाच्या त्या
कार्यामुळे आहे; 20 जे परमेश्वराने येशू ख्रिस्तांच्या ठायी केले, की येशूंना मेलेल्यांतून जिवंत उठवून आणि स्वर्गीक स्थानी
आपल्या उजवीकडे बसविले, 21 आणि येशूंना आता आणि येणाऱ्या समयाचे कोणाचेही शासन, अधिकार, शक्ति, प्रभूता
आणि कोणतेही नांव असो, त्या सर्वांहून खूपच उंच ठरविले. 22 सर्व काही त्यांच्या पायांखाली करून, त्यांना मस्तक
(प्रमुख) असे करून चर्चला देऊन टाकले. 23 चर्च त्यांचे शरीर आहे आणि ते ख्रिस्तमय होऊन पुरेपूर भरलेले आहे, आणि
ख्रिस्त आपल्या उपस्थितीने सर्व स्थान भरून टाकतात.

## 2

1 तुम्ही आपल्या अपराधांत आणि दुष्टाईत मेलेले होता आणि 2 पूर्वीच्या समयी तुम्ही या जगाच्या पद्धती, आकाशांतील
शक्तिचा शासक सैतान म्हणजे तो आत्मा, जो आज देखील आज्ञांचे उल्लंघन करणाऱ्या लोकांठायी कार्य करितो आहे

त्यानुसार जीवन जगत होता. 3 आणि आम्ही सर्व देखील त्यांच्यापैकीच होतो, ज्यांचे जीवन जुना स्वभाव व मनाच्या
इच्छा पूर्ण करण्यात खर्च होत होते, म्हणून स्वभावाने दुसऱ्यांसारखेच परमेश्वरी दंडाच्या आधीन होतो. 4 परंतु परमेश्वर
जो दयेने समृद्ध आहे, आपल्या मोठ्या प्रेमामुळे आपल्यावर प्रेम केले. 5 जेव्हा आम्ही आपल्या दुष्टाईच्या स्थितीत
मेलेले होतो त्या समयी सुद्धा परमेश्वराने आपल्याला ख्रिस्तांबरोबर जिवंत केले (अर्थात असीम दयेमुळें आपल्याला
मुक्ति मिळाली) 6 आणि आपल्याबरोबर उठवून स्वर्गीक स्थानी (येशू ख्रिस्तांबरोबर) बसविले; 7 यासाठी की येणाऱ्या
युगात येशू ख्रिस्तांद्वारे जे दयाळू आहेत, असीम कृपेचे ते समृद्ध होत जाणारे महान धन आपणास दाखवावें, 8 याच
अनुग्रहामुळे (अटहीन कृपा) आणि विश्वासाद्वारे तुम्हांला उद्धार मिळालेला आहे, हे तारण तुमच्या कोणत्याही योग्यतेमुळे
नव्हे तर परमेश्वरातर्फे बक्षिस आहे. 9 ते कर्मामुळे प्राप्त होत नाही, म्हणून कोणीही अभिमानी होऊ नये कारण 10 आपण
त्याच्या हातांची कृति आहोत आणि ख्रिस्त येशूंठायी चांगुलपणाची सर्व कृत्यें करण्यासाठी रचविले गेलो आहोत, जी
परमेश्वराने पूर्वीपासूनच आपल्याकरिता ठरवून ठेवलेली होती.

11 यास्तव या गोष्टीचे स्मरण करा, की पूर्वी तुम्ही शारीरिक रीतिने सुंता केलेल्या लोकांद्वारे (यहूदी) गैरयहूदी आणि
'बेसुंती' अर्थात 'सुंता न झालेले' असे म्हणविले जात होता. 12 त्या समयी तुम्ही ख्रिस्तांशिवाय इस्त्राएलाबाहेरचे,
वचनाच्या करारास अजाण व या जगातील जीवनात परमेश्वर पित्याशिवाय आशाहीन असे होता. 13 तुम्ही जे एकेकाळी
पुष्कळ दूर होता, आता येशू ख्रिस्त व त्यांच्या रक्ताद्वारे पित्याजवळ आणले गेले आहा.

14 येशूंद्वारेच मेळ शक्य आहे, येशूंनी दोघांना (यहूदी-गैरयहूदी) एक केले आणि आमच्यामध्ये असलेली विभागणी
करणारी भिंत पाडून टाकली. 15 येशूंनी गैरयहूदी व यहूदी असे विभाजन करणारे नियम क्रूसावरील मरणाद्वारे संपविले व
येशूंनी या दोघांमध्ये मेळ घडवून त्यांना आपल्याठायी स्वत:चा ‘एक नवा मनुष्य’ केले; 16 असे देखील की आपल्या
क्रूसावरील मरणाद्वारे, या दोघांचा एक देह करून परमेश्वराबरोबर त्यांचा मेळ केला. अशा प्रकारे येशूंनी यहूदी व
गैरयहूदी यांचे शत्रूत्व आपल्या क्रूसावर एकदाचे कायमचे समाप्त केले. 17 तुम्ही गैरयहूदी जो दूर होता आणि तुम्ही
यहूदी जे जवळ होता, त्या सर्वांना येशूंनी आनंदाची वार्ता यासाठी सांगितली, 18 की त्यांच्याद्वारें पवित्र आत्म्याच्या
साहाय्याने आपण दोघांनी पित्यापर्यंत (त्याच्याजवळ) प्रवेश घ्यावा (पोहंचावे).

19 म्हणूनच आता तुम्ही अनोळखी आणि परकीय (विदेशी) राहिला नाही, परंतु पवित्र लोकांचे बरोबरीचे नागरिक
आणि परमेश्वर पित्याच्या घराण्याचे झाला आहा. 20 येशू ख्रिस्त ज्या इमारतीचे प्रमुख (वैशिष्टयपूर्ण) दगड आहेत,
त्यांच्याठायीच प्रेषित व संदेष्टयांच्या पायावर तुम्ही रचला गेला आहा. 21 येशूंठायी पूर्ण इमारत जोडून जोडून रचलेली
आहे आणि त्यांच्यातच विश्वासीं लोक जोडले जातात आणि पवित्रभवन होत जातात. 22 तुम्ही देखील एकत्र मिळून,
परमेश्वराकरिता एक असे निवास स्थान म्हणून रचले जात आहा, जेथे परमेश्वर आपल्या आत्म्याद्वारे वस्ती करितो.

## 3

1 याच कारणास्तव, मी पौल तुम्हां गैरयहूदी लोकांसाठी येशू ख्रिस्तांचा कैदी आहे, 2 यासाठी की परमेश्वराची कृपा व
ख्रिस्तांचे रहस्य जे तुमच्याकरिता मला दिले व 3 कशा प्रकारे त्याने स्वर्गीक ज्ञानाद्वारें (प्रकाश) मला कळविले (जसे मी
आधी थोडक्यांत लिहिले आहे), 4 त्या रहस्याविषयीचे माझे ज्ञान हे पत्र वाचून, तुम्ही जाणून समजून घ्यावे. 5 ज्याप्रमाणे
आता आत्म्याद्वारे, त्यांचे प्रेषित व संदेष्टयांवर प्रगट केले गेले आहे, पहिल्या युगात हा भेद (रहस्य) मनुष्यांवर प्रगट
केला गेला नव्हता. 6 ते रहस्य हेच की यहूदी लोकांबरोबर, एकाच शरीरात गैरयहूदी लोकांनी वतन, सदस्यता आणि
येशूवार्तेद्वारे त्याच अभिवचनांचे वाटेकरी व्हावे. 7 परमेश्वरी बळाच्या कृतिनुसार (मोठ्या कृपेचे बक्षिस) ज्या
येशूवार्तेचा मी सेवक झालो, ते त्याच्या शक्तिच्या प्रभावशाली रूपाने कार्य करण्याच्या प्रणालीमुळे मला दिले गेले. 8 मी
सर्व पवित्र लोकांत लहानाहून लहान आहे, तरी मला ही कृपा प्राप्त झाली की मी गैरयहूदी लोकांना ख्रिस्तांच्या
(रहस्यमय संपत्ति) अतिगहन धनाविषयी सांगावे. 9 परमेश्वर पिता जो रचनाकार आहे ज्याने येशू ख्रिस्तांद्वारें सर्व काही
निर्माण केले, जगाच्या प्रारंभापासून हे रहस्य गुप्त राहिलेले होते, 10 याकरिता की आता परमेश्वराचे अनेकविध

(निरनिराळे) ज्ञान व आकाशांतील स्वर्गीक स्थान, चर्चद्वारे शासकांना (प्रधान) आणि अधिकाऱ्यांना सांगितले जावे.
[11] आपले स्वामी येशू ख्रिस्त यांच्यामध्ये आपला अनंतकालिक हेतू (विचार) पूर्ण करण्याकरितां त्याने आपल्याला
नेमिलेले होते; [12] ज्याठायी त्यांच्यावर विश्वास करण्याद्वारे, आपल्याला धाडस आणि विश्वास झाला की शिरण्याच्या
मार्गान्वये आपण परमेश्वरापर्यंत पोहंचू शकू. [13] मी तुम्हांला विनंती करितो की तुमच्यासाठी मला जे दुःख झाले, त्यामुळे
तुम्ही धीर सोडून खचून जाता कामा नये कारण तुमच्यासाठी हीच गौरवपूर्ण बाब आहे.
[14] म्हणून मी आपल्या पित्यासमोर गुडघे टेकतो, [15] ज्याच्याद्वारे स्वर्ग आणि पृथ्वीच्या प्रत्येक घराण्याचे नांव देण्यात
येते (अस्तित्व आहे), [16] की त्याच्या गौरवाच्या धनानुसार त्याने असे होऊ द्यावे, की तुम्ही आंतरिक जीवनात त्याच्या
आत्म्याच्या साहाय्याने बलशाली (मजबूत) व्हावे [17] आणि विश्वासाद्वारे ख्रिस्तांनी तुमच्या जीवनी वसावे; [18] परमेश्वरी
प्रेमात खोलवर मूळ धरून भरभक्कम होत जावे आणि सर्व पवित्र लोकांबरोबर या गोष्टीची जाणीव करून घ्यावी की या
प्रेमाची रूंदी, लांबी, उंची व खोली किती आहे व [19] ख्रिस्तांचे प्रेम जे बुद्धीपलीकडील आहे ते यासाठी जाणून घ्यावे की
तुम्ही परमेश्वर पित्याच्या सर्व भरपूरीने (विपुलतेने) परिपूर्ण व्हावें.
[20] आता जो असा सामर्थी आहे की आपल्या जीवनात कार्य करणाऱ्या शक्तिद्वारे, आपल्या मागण्या किंवा आपल्या
वैचारिक कल्पनांपलीकडे अधिकाधिक प्रमाणात करतो, [21] त्या परमेश्वराचा महिमा, चर्चमध्ये आणि ख्रिस्त येशूंठायी
पिढीपासून पिढीपर्यंत होत राहो.

# 4

[1] यास्तव मी ख्रिस्त येशूंचा कैदी, तुम्हांला असे म्हणतो की बोलाविले जाण्यायोग्य आपले जीवन जगा. [2] पूर्ण लीनता,
नम्रता आणि धीर धरून प्रेमाने एकमेकांचे सहन करा. [3] मेळाच्या बंधनांत पवित्र आत्म्याची एकता कायम ठेवण्याचा
प्रयत्न करा. [4] देह एकच आहे, एकच आत्मा आहे, अगदी त्याचप्रमाणे तुम्ही एका आशेत बोलाविले गेलेला आहा.
[5] एकच प्रभू, एकच विश्वास, एकच बाप्तिस्मा आहे. [6] एक परमेश्वर जो सर्वांचा पिता आहे, जो सर्वांत वरच्या
स्थानी,सर्वांच्या मध्यें आणि सर्वांठायी आहे.
[7] परंतु ख्रिस्तांनी आपल्या औदार्याच्या (उदारता) मापाने, आपल्यापैकी प्रत्येकाला अटहीन कृपा दिलेली आहे (किंवा
अनुग्रह दिला आहे) [8] म्हणून तो म्हणतो, “जेव्हा ते उच्चस्थानी (स्वर्गात) चढले, तेव्हा त्यांनी गुलामी बांधण्यात पुढाकार
घेतला आणि लोकांना बक्षिसें दिलीत.”
[9] ‘ते उच्चस्थानी चढले’ याचा अर्थ काय आहे? तो असा की, ते पहिले, पृथ्वीच्या खालच्या भागांत उतरले? [10] ते जे
अधोलोकी (खालचे भाग) उतरले होते, तेच आहेत जे सर्व आकाशांच्याही वर चढले, यासाठी की सर्व काही परिपूर्ण
करावे. [11] ते येशूंच होते ज्यांनी वेगवेगळया लोकांना प्रेषित, संदेष्टे, सुवार्तिक, प्रचारक आणि शिक्षक असे नेमून दिले.
[12] जेणेकरून पवित्र लोक सेवेकरिता तयार केले जावेत, यासाठी की ख्रिस्तांच्या देहाने (चर्च) उन्नति करीत जावे.
[13] जोपर्यंत विश्वासाची एकता, परमेश्वर पित्याच्या पुत्राचे पूर्ण ज्ञान, बुद्धीमान मनुष्य होत जाण्यापर्यंत आणि ख्रिस्तांच्या
पूर्णत्वाठायी प्रौढावस्थेपर्यंत आपण सर्व पोहचत नाही तोपर्यंत दिले. [14] जेणेकरून आपण बाळकांसारखे इकडे तिकडे
सर्व सिद्धांतांच्या वाऱ्याने लोकांची चलाखी, धूर्तपणा आणि लुच्चेगिरी व कावेबाजपणाने हेलकावे खाणारे व त्याबरोबर
वाहून जाणाऱ्यांसारखे होता कामा नये. [15] परंतु प्रेमाने सत्य बोलून, ख्रिस्तांसारखे जे चर्चचे मस्तक (प्रमुख) आहेत,
प्रत्येक प्रकारें अधिकाधिक वाढत जावे. [16] ज्यामुळे संपूर्ण शरीर, प्रत्येक सांध्यात एकत्र विणले जाऊन वाढत जाते.
जसा प्रत्येक अवयव आपआपली भूमिका (कार्य) करीत जातो तसतसा तो देह, प्रेमामध्ये उन्नति करीत जातो .
[17] मी हे ख्रिस्तांठायी भर देऊन याकरिता निश्चितपणे घोषित करितो, की तुम्ही दुसऱ्यांसारखे (गैरयहूदी) व्यर्थ
विचारांचे आणि कुचकामी व निष्फळ मनाने आपले जीवन व्यतीत करू नये, [18] कारण जे अज्ञान त्यांच्याठायी आहे
आणि अंतःकरणांत जो कठोरपणा भरलेला आहे, त्यामुळे त्यांची बुद्धि अंधकारमय झालेली आहे आणि ते परमेश्वरी
जीवनापासून बाजूला ठेवले गेले (वेगळे झाले) आहेत. [19] ते प्रत्येक प्रकारें अनियंत्रित व बेलगाम झालेले आहेत, कारण

त्यांनी, प्रत्येक प्रकारचा घाणेरडापणा आणि मोह-लोभ यांच्या सरावांसाठी आपल्या स्वतःला कामातुरपणाच्या स्वाधीन
केलेले आहे.
[20] तुम्ही ख्रिस्तांपासून असे सर्व करावयाचे शिकला नाहीत, [21] कारण त्यांच्या विषयी(येशूंच्या) तुम्ही सर्व काही ऐकले
आहे आणि येशूंठायी असलेल्या सत्याची जाणीव तुम्हांला झालेली आहे. [22] आपला जुना मनुष्य काढून टाका जो
तुम्हांला भ्रमांत घालणाऱ्या अभिलाषांमुळे (धोका देण्याची इच्छा) भ्रष्ट झालेला आहे. [23] आणि आपल्या अंतःकरणाच्या
आत्म्याठायी (विचार व व्यवहार) नवीन होत जा. [24] नवीन मनुष्यत्व (नवीन माणुसकी) धारण करा, जे परमेश्वराच्या
समान रूपात, अर्थात सत्याचे नीतिमत्व आणि पवित्रता यांच्यात बनविले गेलेले आहे.
[25] म्हणून लबाडी व खोटेपणा बाजूला करा, प्रत्येक व्यक्तिने आपल्या शेजाऱ्यांबरोबर सत्य बोलावे कारण आपण
एकमेकांचे अवयव आहोत. [26] राग बाळगा, परंतु अपराध करू नका. सूर्यास्तापूर्वी तुमचा राग थंड होऊन जावा.
[27] सैतानाला संधी देऊ नका. [28] जो मनुष्य पूर्वी चोरी करीत असे, त्याने पुढे तसे करू नये; त्याऐवजी त्याने आपल्या
हातांनी कांही चांगुलपणाची कृत्यें करण्यासाठी परिश्रम करावेत, यासाठी की गरजू लोकांना देण्यासाठी, त्याच्याजवळ
काही असावे.
[29] तुमच्या मुखांतून भ्रष्ट व घृणित वचन निघता कामा नये, परंतु तेच निघावे जे उन्नतिकरिता फायद्याचे आहे; म्हणजे
अशी गोष्ट जी ऐकणाऱ्यांच्या जीवनात चांगुलपणा (अनुग्रह) घेऊन येईल. [30] तुम्ही परमेश्वर पित्याच्या आत्म्याला दुःखी
करू नका कारण त्याच्याद्वारेच, सुटकाऱ्याच्या दिवसासाठी तुमच्यावर शिक्का मारला गेला आहे. [31] सर्व कडूपण, संतप्त
होण्याचा अवगुण, क्रोध, तंटा, निंदा आणि परपीडा बुद्धि, या सर्व गोष्टी तुमच्यापासून दूर राहोत. [32] नव्हे, तुम्ही करूणेने
भरलेले, कृपाळू, कोमल हळूवार मनाचे व्हा. तुम्ही एकमेकांला क्षमा करणारे व्हा, अगदी तसेच जसे परमेश्वराने
ख्रिस्तांठायी तुम्हांला क्षमा केलेले आहे.

# 5

[1] म्हणून प्रिय बालकांसारखे, परमेश्वराचे ऐकणारे व अनुकरण करणारे व्हा. [2] ज्या प्रकारे ख्रिस्तांनी आपल्यावर प्रेम
केले आणि स्वतःला सुवासिक अत्तरासारखे परमेश्वराकरिता एक अर्पण व बलिदान रूपात दिले, त्याच प्रकारें तुम्ही
देखील प्रेमाचे जीवन जगा.
[3] पवित्र लोकांसाठी जसे योग्य आहे त्याप्रमाणे जगा. तुमच्यामध्ये यौन अनैतिकता, सर्व प्रकारची अशुद्धता किंवा लोभ
यांसारख्या गोष्टी अजिबात ऐकावयासही येऊ नयेत. [4] आणि तुमच्यात अश्लील व गलिच्छ गोष्टी आणि मूर्खपणाच्या
गोष्टी, असभ्य व उद्धट टवाळी ज्या योग्य व सभ्यपणाच्या नाहीत, त्या मुळीच होता कामा नये पण त्याऐवजी
उपकारस्तुति, आभार मानणे ही सर्व होत जावीत. [5] कारण तुम्हांला जाणीव आहे की यौन अपराधांत लिप्त असलेला
मनुष्य, अशुद्ध मनुष्य आणि लोभी मनुष्य या सर्वांचा (कारण असे लोक मुर्तिपूजक आहेत), ख्रिस्त आणि परमेश्वराच्या
राज्यात कोणताच वारसा (भागीदारी) नाहीये. [6] कोणीही तुम्हांला निरर्थक गोष्टींनी फसवू नये, कारण या कारणान्वये
आज्ञा पालन न करणाऱ्यांवर परमेश्वराचा दंड येतो. [7] यास्तव अशा लोकांचे भागीदार होऊ नका.
[8] कारण एक समय होता, जेव्हा तुम्ही अंधकार असे होता, परंतु आता येशूंठायी प्रकाश आहा, म्हणून प्रकाशाच्या
संतानांसारखे जीवन जगा. [9] कारण प्रकाशाचा प्रभाव, अर्थात सर्व प्रकारचा चांगुलपणा, नीतिमत्व आणि सत्यता यांत
प्रगट होतो. [10] येशूंना काय आवडते, हे जाणून घेत चला; [11] अंधकाराच्या निष्फळ कृत्यांबरोबर कोणत्याही प्रकारची
भागीदारी करू नका, परंतु ती सर्वांसमोर प्रगट करीत जा. [12] कारण गुप्तपणें ज्या ज्या गोष्टी ते करीत असतात, त्या
स्वमुखातून बोलणे देखील लज्जास्पद (लाजिरवाणे करणारे) आहे. [13] परंतु सर्व दडलेल्या गोष्टी ज्यांचा खुलासा केला
जातो, त्या प्रकाशाद्वारे उजेडात आणल्या जाऊन उघडकीस येतात, कारण प्रकाशच आहे जो उघड करीत असतो.
[14] म्हणून लिहिले आहे की, (ते म्हणतात की) “तूं जो झोपेत आहेस, जागा हो आणि मेलेल्यांतून जिवंत असे ऊठ व येशू
तुला प्रकाश देतील.”

15 म्हणूनच काळजीपूर्वक रीतिने पहा, की तुम्ही मूर्खासारखे नव्हें पण ज्ञान्यांसारखे चालत आहा, 16 वेळेचे मूल्य
जाणा, कारण दिवस वाईट आहेत. 17 यास्तव अज्ञानी, होऊ नका, बुद्धीमानीने समजून घ्या, की येशूंची मनीषा काय
आहे. 18 दारूच्या झिंगलेल्या अवस्थेपासून लांब रहा, कारण त्यामुळे जीवन अशोभनीय (व्यभिचारी) वर्तनामुळे नष्ट होत
जाते, पण त्या विपरित पवित्र आत्म्याने भरपूर (विपुल) होत चला. 19 आपसांत एकदुसऱ्याला, आणि अंतःकरणांत
भजन, गीत आणि प्रभूगीतें गात रहा आणि स्वरमाधुर्य पसरत चला. 20 आपले प्रभू येशू ख्रिस्त यांच्या नांवाने परमेश्वर
पित्याचे सर्व गोष्टींत आभार मानत रहा,
21 आणि परमेश्वराचे भय बाळगून एकमेकांच्या आधीन व्हा.
22 स्त्रियांनो, आपल्या पतींच्या आधीनतेंत असे रहा, जसे येशू ख्रिस्तांच्या आधीन आहांत. 23 कारण पति देखील
पत्नीचा प्रमुख (मस्तक) आहे, जसे ख्रिस्त चर्चेचे (देह) प्रमुख आहेत, याच देहाचे ते तारक (उद्धारकर्ता) आहेत. 24 ज्या
प्रकारे चर्च ख्रिस्तांची आधीनता स्वीकार करिते तसेच स्त्रियांनी देखील सर्व गोष्टींत पतींचे मान्य करावे.
25 पतींनो, आपल्या पत्नींवर प्रेम करा, जसे येशूंनी चर्चवर प्रेम केले आणि आपल्या स्वतःला त्याच्यासाठी समर्पित
केले, 26 याकरिता की चर्चला त्यांनी वचनाच्या जलाने धुवून शुद्ध करावे. 27 आणि ख्रिस्तांनी आपल्या स्वतःकरिता एक
तेजोमय चर्च तयार करावे, ज्याच्याठायी डाग किंवा सुरकुती नसावी, परंतु ते पवित्र आणि निष्कलंक असे ठरावे.
28 म्हणून पतींनी, आपल्या पत्नींवर अशा प्रकारे प्रेम करावे, जसे ते आपल्या स्वतःच्या देहांवर प्रेम करितात. 29 कधीही,
कोणत्याही मनुष्याने आपल्या शरीराशी द्वेष केला नाही, परंतु तो त्याचे संवर्धन व त्याची जोपासना करून प्रेमाने त्याची
काळजी घेतो, अगदी तशीच जसे येशू चर्चची जोपासना (पालनपोषण) करितात. 30 कारण आपण त्यांच्या देहाचे (मांस
व हाडें) अवयव आहोत. 31 यास्तव एक पुरूष आपल्या आईबापाला सोडून आणि आपल्या पत्नीशी जोडला जाईल
आणि ते दोघे एकदेह होतील. 32 हे एक मोठे रहस्य आहे, परंतु मी तर ख्रिस्त आणि चर्चविषयी बोलतो आहे. 33 तरीपण
तुमच्यातील प्रत्येक मनुष्याने आपल्या पत्नीशी असे प्रेम ठेवावे, जसे ते आपल्या स्वतःवर ठेवतात; पत्नीनेही आपल्या
पतिचा आदर करावा (भय बाळगावे).

# 6

1 बालकांनो, येशूंमध्ये आपल्या आई वडीलांचे ऐका अर्थात त्यांची आज्ञा पाळा, कारण असे करणे बरोबर आहे.
2 "आपल्या वडीलांचा आणि आईचा आदर कर, अशी पहिली आज्ञा आहे, ज्याबरोबर एक अभिवचन जुळलेले आहे.
3 ती प्रतिज्ञा (अभिवचन) हीच की, 'तुमची भलेपणाची कृत्यें अशी असावीत ज्याद्वारे या जगांत तुम्ही खूप वर्षें (दीर्घ
समय) जिवंत रहावे.'
4 मुलें असलेल्यांनो, आपल्या मुलांना राग येईल असे त्यांना प्रवृत्त करू नका, परंतु येशूंच्या साहाय्याने (शिकवण)
त्यांचे पालन पोषण करा आणि ठामपणे सांगून त्यांची कान उघाडणी करून त्यांना निक्षून समज द्या.
5 अहो नोकरांनो, भीत व कांपत आणि अंतःकरणाच्या सत्यासह आपल्या मालकाच्या (स्वामी) आज्ञेचे पालन अशा
प्रकारे करा, जसे काही तुम्ही येशूंचे सेवक आहात 6 लोकांना दाखविण्यासाठी व त्यांना खुश करण्यासाठी तुम्ही सेवा
करू नका, परंतु ख्रिस्तांचे गुलाम म्हणून व त्यांचीच सेवा समजून; 7 मनःपूर्वक तळमळ बाळगून पित्याची इच्छा पूर्ण
करण्याकरिता त्यांची सेवा करा. 8 या गोष्टीची जाणीव ठेवा की जो मनुष्य चांगुलपणाची कृत्यें करितो, तो नोकरी करीत
असला किंवा स्वतःचा व्यवसाय सांभाळीत असला, त्या मनुष्याला येशू योग्य मजूरी (बक्षिस) देतीलच.
9 मालकांनो, तुम्ही आपल्या नोकरांना धमकी देऊ नका. त्यांच्याशी चांगला व्यवहार करा. या बाबतची जाणीव असू
द्या की तुमचा मालक (प्रभू) परमेश्वर स्वर्गात आहे आणि तो कोणाचाही पक्षपात करीत नाही.
10 शेवटी, माझ्या भावांनो प्रभूमध्यें आणि त्यांच्या सामर्थ्याच्या प्रभावाने भक्कम बलवान होत जा. 11 परमेश्वराची सर्व
हत्यारें धारण करा, यासाठी की सैतानाच्या वाईट युक्ति व डावपेंचांपुढे तुम्हांला उभे (सामना) राहता यावे. 12 कारण
आम्ही मनुष्यांविरूद्ध नाही, परंतु आकाश मंडळाचे शासक, अधिकारी, या जगाच्या अंधाराचे राजकुमार आणि

दुष्टाईच्या आकाशी सेनेशी संघर्ष करतो. 13 म्हणून तुम्ही परमेश्वराची सर्व हत्यारें घ्या म्हणजे तुम्हांला वाईट दिवसांत सर्व
गोष्टींचा प्रतिकार करून (तोंड देऊन) नंतर स्थिर राहता यावे. 14 म्हणून सत्याने आपली कंबर कसा, नीतिमत्वाचे कवच
घालून, 15 आणि पायांत मेळाच्या वार्तेच्या तयारीचे जोडे चढवा. 16 आणि त्या सर्वांहून अधिक विश्वासाची ढाल हातांत
घ्या, ज्यामुळे तुम्हांला दुष्टाचे जळते बाण विझविता यावेत. 17 उद्धाराची टणक टोपी (झिल्लीम) आणि पवित्र आत्म्याची
तरवार अर्थात जे परमेश्वराचे वचन आहे ही घ्या. 18 सर्व प्रकारच्या विनंतीसह (प्रार्थना) प्रत्येक समयी पवित्र
लोकांकरिता सतर्कतेने आणि धीराने प्रार्थना करीत रहा.

19 माझ्या करिताही प्रार्थना करा, म्हणजे मला बोलण्याची संधी मिळताच येशूवार्तेचे रहस्य धाडसाने सांगण्यासाठी मी
आपले तोंड उघडावे. 20 या कारणास्तवच तर मी बेडयांत जखडलेला राजदूत आहे. प्रार्थना करीत रहा, की जितक्या
हिंमतीने मला संदेश द्यावयास हवा, मी तो द्यावा.

21 तुखिक, जो प्रिय भाऊ आणि ख्रिस्तांचा विश्वसनीय सेवक आहे, तुम्हांला सर्व काही कळवील; ज्यामुळे तुम्हांला
माझ्याविषयी कळेल की मी काय करीत आहे. 22 याच कारणास्तव मी त्याला तुमच्याकडे पाठविलेले आहे म्हणजे माझी
अवस्था तुम्हांला कळेल आणि त्यामुळे तुमच्या हृदयाची (अंतःकरणाची) हिंमत वाढेल.

23 आमच्या बंधूंना आणि भगिनींना, येशू ख्रिस्त आणि परमेश्वर पित्यापासून शांति आणि विश्वासासह प्रेम प्राप्त व्हावे.
24 जे लोक खरेपणाने (सत्य) येशू ख्रिस्तांशी प्रेम करितात त्यांच्यावर अनुग्रह कायम असो.